नियमीत दिवाणी दावा क्र. २७/२०२२
शोभा वि. ग्रामस्थ पंच कमिटी व इतर

## निशाणी क्र. २६ कडील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ नुसार दावा दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, दावा दाखल झाल्यानंतर दिनांक ०९/०२/२०२३ रोजी फेरफार नोंद नं. ७१३ नुसार दावा मिळकतीचे ७/१२ च्या उता-यावर वादीचे नाव रद्द झाले आहे. परंतू, त्याबाबत कैफियत व म्हणणे मध्ये कथन करण्यात आले नसल्यामुळे प्रतिवादीने प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे. वादी यांनी आपले म्हणणे दाखल करुन अर्ज खोटा खोडसाळपणे दाखल केला असल्यामुळे खर्चासह फेटाळण्यात यावा अशी मागणी केली आहे.

२. प्रतिवादी व वादी यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तूतचा दावा तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या अर्जावरील सुनावणीसाठी प्रलंबित असून प्रस्तूत दुरुस्ती दाव्याचा निकाल गुण-अवगुणावर लागण्यासाठी आवश्यक आहे या मतास मी पोहचलो आहे. करिता मी खालील आदेश पारित करतो .

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. प्रतिवादी यांनी प्रस्तूत आदेशापासून १४ दिवसाच्या आत लेखी जबाब व कैफियतीमध्ये प्रस्तावित दुरुस्ती करुन दुरुस्ती कैफियत सादर करावी.
३. पक्षकारांनी अर्जाचा खर्च आपापला सोसावा.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

(सं. गं. सरोदे)
दिनांक : १७/०३/२०२३ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरुड